# अहवाल

डॉ. हनुमंत फाटक,
समन्वयक,
सामाजिकशास्त्र व्याख्यानमाला
राज्यशास्त्र विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग
दि. ७/०१/२०२०

प्रती,
मा. प्राचार्य,
तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान
आणि वाणिज्य महाविद्यालय,
बारामती.

विषय:— 'सामाजिकशास्त्र व्याख्यानमालेतील प्रथम व्याख्यानाचा अहवाल

मा. महोदय,

उपरोक्त विषयान्वये, आपणांस अहवाल सादर करतो की, मंगळवार, दि. ०७ जानेवारी, २०२० रोजी राज्यशास्त्र विभागाच्या वतीने सामाजिकशास्त्र व्याख्यानमाले अंतर्गत 'लोकशाहीतील बहुसंख्याकवाद' या विषयावर मा. डॉ. शुजा शाकीर, राज्यशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे 'लोकशाहीतील बहुसंख्याकवाद' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानाचा प्रारंभ सकाळी ११:०० वा. ऑडीटोरियम सभागृहात पार पडला. या प्रसंगी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर अध्यक्षस्थानी होते. राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख व सामाजिकशास्त्र व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. हनुमंत फाटक यांनी कर्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, प्रा. आविनाश सावळकर, अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. समाधान पाटील, प्रा. कृष्णा कुलकर्णी, डॉ. सीमा नाईक गोसावी, प्रा. जय राणे, सौ. सुषमा संगई मॅडम हे उपस्थित होते. या व्याख्यानासाठी पदवी व पदव्युत्तर स्तरावरील एकूण ११६ विद्यार्थी आणि विविध विद्याशाखेतील प्राध्यापक सहभागी झाले होते.

यावेळी मा. डॉ. शुजा शाकीर यांनी आपल्या व्याख्यानात लोकशाहीतील बहुसंख्याकवाद या विषयावर मांडणी केली. त्यांनी लोकशाही व्यवस्थेच्या सध्याच्या परिस्थीतवर आपल्या विचारांची मांडणी केली. लोकशाही मध्ये बहुसंख्याकवाद मान्य केला, तरी आजचा लोकशाहीतील बहुसंख्याकवाद हा धर्म, वंश, वर्ण, जात या मार्गाने जात आहे. या लोकशाहीमध्ये बहुसंख्याकांचे बाजुने निर्णय घेतले जातात. त्यामुळे अल्पसंख्याकांना निर्णय प्रक्रियेत डावलले जात आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यामुळे लोकशाही समोर आव्हान निर्माण होत आहे. सध्याच्या लोकशाहीसाठी ही चिंतेची बाब असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी जगभरात झालेल्या अनेक अभ्यासांचे संदर्भ दिले.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Scanned with OKEN Scanner

मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी भविष्याचा वेध घेत आसताना एकाच विषयाचे ज्ञान संपादन करुन चालणार नाही. तर विद्यार्थीनी आंतरविद्याशाखीय अभ्यासाकडे आपले लक्ष केंद्रीत केले पाहिजे. सुरुवातीच्या काळात समाज हा मोजका आणि सिमित होता. त्या समुहाला अंकीत करणे अगदी सोपे होते. त्यावेळी धर्म व राजेशाही सारख्या व्यवस्था निर्माण झाल्या. आपल्या कोणत्याही इतिहासामध्ये राजेशाहीचा इतिहास मांडला जातो. परंतु त्या काळातील समाज कसा होता. समाज रचना कशी होती. याविषयीचे वर्णन आढळत नाही. म्हणजे मानवकेंद्री इतिहास मांडलेला दिसत नाही. आपल्या लोकशाहीत लोकांनी लोकांवर राज्य करावे. ही क्षमता आहे का असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. कारण आपल्या लोकशाहीतील लोकप्रातिनिधीना अनेक प्रकारच्या सोय सुविधा उपलबध करुन दिल्या जातात. एक अर्थाने लोकशाहीच्या अडून छुपी सरजांमी व्यवस्था निर्माण केली जात आहे. लोकप्रातिनिधीच्या संपत्ती मध्ये मोठ्या प्रमाणत वाढ होत आहे. एका बाजुला गरिब हे अधिक गरिब बनत आहे. तर दुसरीकडे श्रीमंत हे अधिक श्रीमंत होत चालले आहेत. पुढील काळात विषमतावादी समाज रचना हे खरे लोकशाही समोरील आव्हान आहे.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. कैलाश मांटे यांनी केले. तर आभार प्रा. राजू पांडे यांनी मानले.

व्याख्यानाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, उपप्राचार्य डॉ. शिवाजी साठे, डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेलवे, डॉ. सचिन गाडेकर, रजिस्टार श्री. अभिनंदन शहा यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले.

सदर आयोजन प्रसंगी विभागातील सर्व प्राध्यापकांनी सहकार्य केले. यामध्ये प्रा. आविनाश सावळकर, प्रा. राजू पांडे, डॉ. कैलाश मांटे यांचे सहकार्य लाभले.

या व्याख्यानासाठी व्याख्यात्याच्या मानधनासाठी मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर यांनी ७०००/– हजार रुपये मंजूर केले आहेत. सदर रक्कम ही व्याख्यात्याच्या खात्यावर जमा करावी ही विनंती.

सोबत:– मा. मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर यांनी व्याख्यानास मंजूरी दिलेले पत्र जोडले आहे.

आपला विश्वासु,

डॉ. हनुमंत फाटक,
समन्वयक,
सामाजिकशास्त्र व्याख्यानमाला
राज्यशास्त्र विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

HOD
Department of Political Science
Tuljaram Chaturchand College
Baramati